**ठळक बातम्या**

- भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांना जयंतीनिमित्त देशभरातून अभिवादन
- गरीब, शेतकरी, युवा आणि महिलांना केंद्रस्थानी ठेवून अनेक आश्वासन देणारा भाजपाचा जाहीरनामा प्रसिद्ध
- पुन्हा सत्तेत आल्यानंतर संविधान किंवा आरक्षण हटवणार नसल्याचा ज्येष्ठ भाजपा नेते अमित शहा यांचा भंडाऱ्यात पुनरुच्चार
- संविधान मजबूत करण्यासाठी, लोकांच्या अधिकारांना मजबूत करण्यासाठी लढत असल्याचं काँग्रेसचे राष्ट्रीय अध्यक्ष मल्लिकार्जुन खर्गे यांचं नागपूरात प्रतिपादन

**आणि**

- फिडे कँडिडेट्स बुद्धिबळ स्पर्धेत ग्रँडमास्टर डी. गुकेश रशियाच्या इयान याच्यासह गुणतालिकेत संयुक्तपणे अव्वल स्थानी

**<><><><><>**

संविधानाचे शिल्पकार भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या १३३व्या जयंतीनिमित्त आज देश त्यांना आदरांजली वाहत आहे.

राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू, उपराष्ट्रपती जगदीप धनखड आणि प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी आज संसद परिसरातल्या डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्याला पुष्पहार अर्पण करून अभिवादन केलं.

सामाजिक परिवर्तनाचे प्रणेते आणि अष्टपैलू व्यक्तिमत्त्व असलेले डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी न्यायशास्त्रज्ञ, शिक्षणतज्ज्ञ, अर्थतज्ज्ञ, समाज-सुधारक आणि राजकीय नेते म्हणून देश आणि समाजासाठी अनन्यसाधारण योगदान दिल्याचं राष्ट्रपतींनी आपल्या संदेशात म्हटलं आहे.

भारताचे महान सुपुत्र डॉ. बाबासाहेब आंबेडकर हे केवळ भारतीय राज्यघटनेचे शिल्पकारच नव्हे तर सामाजिक न्यायाचे धुरीण होते. सामाजिक विषमता आणि भेदभाव नष्ट करण्यासाठी त्यांचे अथक प्रयत्न अनेक पिढ्यांना प्रेरणा देत असल्याचं उपराष्ट्रपती धनखड यांनी आपल्या संदेशात म्हटलं आहे.

बाबासाहेबांच्या दूरदृष्टीमुळेच आज भारत देशाची प्रतिमा वेगळी आहे. बाबासाहेबांची दूरदृष्टी हीच विकासाची प्रेरणा असल्याचं प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी म्हटलं आहे. मेक इन इंडिया, स्मार्ट सिटी मिशन, मुद्रा योजना, स्टार्टअप इंडिया आणि स्टँडअप इंडियासह विकासाच्या अनेक योजना आंबेडकर यांच्या दूरदृष्टीमधूनच साकारल्याचं प्रधानमंत्र्यांनी सांगितलं.

दरम्यान, मध्य प्रदेशातील महू या बाबासाहेब आंबेडकर यांच्या जन्मस्थळी त्यांच्या जयंतीनिमित्तानं विशेष कार्यक्रमाचं आयोजन केलं आहे.

**<><><><><>**

मुंबईत राज्यपाल रमेश बैस यांनी भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंतीनिमित्त दादरच्या चैत्यभूमीवर जाऊन अभिवादन केलं. यावेळी हेलिकॉप्टर मधून चैत्यभूमीवर पुष्पवृष्टी करण्यात आली.

मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनीही चैत्यभूमीवर जाऊन बाबासाहेबांना अभिवादन केलं. बाबासाहेबांनी तयार केलेल्या संविधानाला अनुसरून राज्याचा कारभार सुरू असल्याचं मुख्यमंत्र्यांनी सांगितलं.

**<><><><><>**

गरीब, शेतकरी, युवा आणि महिला या चार घटकांना केंद्रस्थानी ठेवून सब का साथ सब का विकास या तत्त्वाच्या आधारे विविध योजनांची आश्वासनं देणारा भाजपाचा निवडणूक जाहीरनामा आज प्रसिद्ध झाला. नवी दिल्ली इथं प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी या जाहीरनाम्याचं लोकार्पण केलं. पक्षाध्यक्ष जगतप्रकाश नड्डा

केंद्रीय गृहमंत्री अमित शाह, संरक्षण मंत्री राजनाथ सिंग, आणि इतर ज्येष्ठ नेते यावेळी उपस्थित होते.

गरिबांना शिधापत्रिकेवर मोफत अन्नधान्य देण्याची योजना पुढची पाच वर्षं चालू ठेवण्याचा, प्रधानमंत्री आवास योजनेअंतर्गत ३ कोटी घरं बांधण्याचा, तसंच ७० वर्षांपेक्षा जास्त वयाच्या प्रत्येक नागरिकापर्यंत आणि तृतीयपंथीयांपर्यंत आयुष्मान भारत योजना पोहोचवण्याचा संकल्प या जाहीरनाम्यात व्यक्त केला आहे. एक देश एक निवडणूक, एकसामायिक मतदार य़ादी, आणि पेपरफुटीविरोधी कायदा करण्याचं आश्वासन भाजपाने या संकल्पपत्रात दिलं आहे. महिलांना माहिती तंत्रज्ञान, पर्यटन आणि इतर क्षेत्रांमधे अधिक वाव मिळवून देण्यासाठी प्रयत्न करण्याचं तसंच पुढच्या ५ वर्षात ३ कोटी महिलांना लखपती दीदी करण्याचं आश्वासन भाजपानं दिलं आहे.

भारतीय अंतराळ स्थानकाची निर्मिती, मानवाचा समावेश असलेली अंतराळ मोहिम, चंद्रावर अंतराळवीर उतरवण्याचं उद्दिष्ट आश्वासन या जाहीरनाम्यात आहे.

**<><><><><>**

भाजपानं सत्तेत असताना गेल्या दहा वर्षांत गोरगरिबांसाठी काहीच केलेलं नसल्यानं, त्यांच्या जाहीरनामाही विश्वासार्ह नसल्याची टीका काँग्रेसचे राष्ट्रीय अध्यक्ष मल्लिकार्जुन खर्गे यांनी केली आहे. ते आज नागपूर इथं बातमीदारांशी बोलत होते. भाजपानं शेतकऱ्यांचं उत्पन्न दुप्पट करण्याचं, शेतमालाची किमान आधारभूत किंमत वाढवण्याची हमी दिली होती, मात्र त्यांनी संपूर्ण जनतेला लाभ होईल असं कोणतेही काम केलंलं नाही, आज तरुण रोजगाराच्या शोधात आहेत, महागाई वाढते आहे, पण प्रधानमंत्र्यांना याची चिंता नाही, त्यांच्याकडे जनतेला देण्यासारखं काहीच नाही असं ते म्हणाले.

**<><><><><>**

भाजपाचा निवडणूक जाहीरनामा म्हणजे 'जुमला पत्र' आहे अशी टीका आम आदमी पक्षाच्या नेत्या आतिशी यांनी केला आहे. सलग १० वर्षे सत्तेत असूनही भाजपाने आश्वासनांची पूर्तता केली नाही, भाजपाने दरवर्षी दोन कोटी नोकऱ्या देण्याचं आश्वासन दिलं होतं, मात्र आज देशात इतिहासातलं सर्वाधिक बेरोजगारीचं प्रमाण आहे असा आरोप त्यांनी केला. आयुष्मान भारत योजनेअंतर्गत संपूर्ण देशात खर्च केली जाणारी रक्कम ही दिल्लीच्या आरोग्यविषयक अर्थसंकल्पीय तरतुदीपेक्षा कमी असल्याचंही त्या म्हणाल्या.

**<><><><><>**

पुन्हा सत्तेत आल्यानंतर संविधान किंवा आरक्षण हटवणार नसल्याचा पुनरुच्चार केंद्रीय मंत्री आणि ज्येष्ठ भाजपा नेते अमित शहा यांनी केला. भंडारा-गोंदिया लोकसभा मतदारसंघातले महायुतीचे अधिकृत उमेदवार सुनील मेंढे यांच्या भंडारा जिल्ह्यातल्या साकोलीतल्या प्रचारसभेत ते बोलत होते. पुन्हा सत्तेत आल्यानंतर छत्तीसगडलाही नक्षलवादीमुक्त करण्याचं आश्वासन त्यांनी दिलं. शरद पवार आणि उद्धव ठाकरे यांचे पक्ष आम्ही नव्हे तर मुलीनं आणि मुलानं तोडल्याचा आरोप त्यांनी केला.

**<><><><><>**

संविधान मजबूत करण्यासाठी, लोकांच्या अधिकारांना मजबूत करण्यासाठी आम्ही लढत आहोत. इंडिया आघाडीची लढाई भाजपाविरुद्ध नसून मनुवादाविरुद्ध आहे, असं प्रतिपादन काँग्रेसचे राष्ट्रीय अध्यक्ष मल्लिकार्जुन खर्गे यांनी आज नागपुरात केलं. नागपूर लोकसभा मतदारसंघातले महाविकास आघाडीचे उमेदवार विकास ठाकरे यांच्या प्रचार सभेत ते बोलत होते. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंतीनिमित्त त्यांना अभिवादन करून खर्गे यांनी भाषणाची सुरुवात केली.

स्वातंत्र्यानंतर देशात लोकशाही आली म्हणूनच वंचितांची दखल घेतली जाऊ लागली. देशासाठी आम्ही मेहनत घेतली, पण तुम्ही काहीही न करता आयते

श्रेय घेत असल्याचा आरोप त्यांनी विरोधकांवर केला. यावेळी त्यांन विरोधी पक्षांवर टीका केली आणि त्यांची आश्वासनं फोल असल्याचा दावा केला.

**<><><><><>**

राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाकडून माढा मतदारसंघातून धैर्यशील मोहिते-पाटील मंगळवारी लोकसभा निवडणुकीचा उमेदवारी अर्ज भरणार आहेत. आज त्यांनी शरद पवार यांच्या पक्षात अधिकृतरित्या प्रवेश केला. सर्वांच्या इच्छेनुसार ते उमेदवारी करत असल्यानं त्यांच्यासह सोलापुर लोकसभा मतदारसंघातही महाविकास आघाडीचा उमेदवार जिंकून येईल अशा विश्वास शरद पवार यांनी आज अकलूजमध्ये व्यक्त केला.

**<><><><><>**

केंद्रात बसपाचं सरकार आल्यास पश्चिम उत्तर प्रदेशला वेगळं राज्य बनवण्यासाठी ठोस पावलं टाकली जातील, असं आश्वासन बसपा प्रमुख मायावती यांनी दिलं आहे.सहारनपूर इथं निवडणूक प्रचाराची सुरुवात करताना मायावती जाहीर सभेत बोलत होत्या. मायावती यांनी आज मुझफ्फरनगर इथंही निवडणूक सभांना संबोधित केलं.

**<><><><><>**

राजस्थानात सीकर इथं आज एक ट्रक आणि कारची टक्कर होऊन झालेल्या अपघातात ७ जण मरण पावले. मृतांमधे दोन लहान मुलं आणि तीन महिलांचा समावेश आहे. हे सर्वजण उत्तर प्रदेशातल्या मेरठचे रहिवासी होते.

**<><><><><>**

कॅनडात सुरू असलेल्या फिडे कॅंडिडेट्स २०२४ बुद्धिबळ स्पर्धेच्या आठव्या फेरीत, भारताचा ग्रँडमास्टर डी. गुकेश यानं विदित गुजराथी याचा पराभव केला. या

विजयासह गुकेश पुरुष गटात पाच गुणांसह गुणतालिकेत रशियाच्या इयान याच्यासह संयुक्तपणे अव्वल स्थानावर पोहोचला आहे. भारताचा आर. प्रज्ञानंद देखील साडेचार गुणांसह अमेरिकेच्या हिकारू नाकामुरा याच्यासोबत संयुक्तपणे तिसऱ्या स्थानावर आहे.

**<><><><><>**

आकाशवाणी मुंबई केंद्राच्या अस्मिता वाहिनीवरुन दुपारी ३ वाजता प्रसारीत होणारं प्रादेशिक बातमीपत्र, उद्या आणि परवा म्हणजेच १५ आणि १६ एप्रिल २०२४ रोजी दुपारी ३ ऐवजी संध्याकाळी ४ वाजता प्रसारीत केलं जाणार आहे.

**<><><><><>**

आयपीएल टी ट्वेंटी क्रिकेट स्पर्धेत आज कोलकता इथं झालेल्या सामन्यात कोलकता नाईट रायडर्सनं लखनऊ सुपर जाएंट्सवर ८ गडी विजय मिळवला. विजयासाठी १६२ धावांचं आव्हान १५ षटकं आणि ४ चेंडूत केवळ २ गड्यांच्या मोबदल्यात कोलकत्यानं पार केलं.

**//<><><><><>//**